सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222
दूरध्वनी : 0253-2230580, 2231734 फॅक्स :2231716
संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac
ज्ञानगंगा घरोघरी
परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/2017/ दिनांक : 02.10.2017.

विद्यापीठात कार्यरत असलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणक्रम :
शैक्षणिक सत्र 2017-18 (प्रवेश शुल्काबाबत) प्रवेशार्थींसाठी महत्वाच्या सूचना

विद्यार्थी मित्रहो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कार्यरत असलेले शिक्षणक्रम **प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर** शिक्षणक्रम 2017-18 साठी आपण विविध अभ्यासकेंद्रावर आपल्या स्वेच्छेने प्रवेश घेतलेला आहे. त्याबद्दल आपले प्रथमतः आभार ! आपला प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील सॉफ्टवेअरमार्फत ऑनलाईन आपण स्वतः, अभ्यासकेंद्रांकडून अथवा जवळच्या सायबर कॅफेकडून संपूर्ण माहितीसह भरून घेतलेला आहे.

ऑनलाईन प्रवेश घेताना आपण सर्व प्रोफाईल पूर्ण भरलेली आहे. आपले प्रवेश शुल्काचे पेमेंट देखील आपण ऑनलाईन नेट बँकीग् डेबीट अथवा क्रेडीट कार्डद्वारे केलेले आहे. आपल्या बँक खात्यातून रक्कम वजा झाली आहे **त्यानुसार आपण प्रथमतः आपल्या युजर आयडीवरून अँप्लिकेशन स्टेटस तपासा. त्यामध्ये बँक स्टेटस सक्सेस असेल तर प्रवेशाची चिंता करू नका. मात्र बँक स्टेटस फेल अथवा डॅश असेल आपले पेमेंट विद्यापीठाला अद्याप आपल्या बँकेकडून प्राप्त झालेले नाही.**

आपणांस प्रवेश अर्जाची प्रिंट मिळालेली नसेल आणि त्यावर आपण शुल्क भरल्याचे बँक ट्रँझॅक्शनची नोंद असेल मात्र प्रवेश शुल्क ऑनलाईन भरून जर आपणांस ऑनलाईन अर्ज प्रिंट मिळाला नाही. पेमेंट करताना विद्यार्थ्यांना बँकेच्या ओटीपी मिळून पेमेंट वेळेत न झाल्यामुळे अनेक वेळा पेमेंट करण्याची वेळ आली होती. तरी देखील पेमेंट पूर्ण वेळेत होऊ शकले नाही, तसेच पेमेंट होऊनही आपणांस प्रवेश अर्जाची प्रिंट मिळाली नसेल तर आपण तात्काळ विद्यापीठाकडे आपला विनंती अर्ज, युजर आयडी व पासवर्डसह माहिती पाठवावी त्यावरून आपले शुल्क विद्यापीठाकडे मिळाले किंवा नाही आणि प्रवेशाची कार्यवाही तपासली जाईल. आपणाकडून प्रवेश आणि शुल्काबाबत कोणतीही माहिती विद्यापीठाला मिळाली नाही तर अशा विद्यार्थ्यांचे पेमेंट विद्यापीठाला प्राप्त झालेले नाही त्यामुळेच त्यांचे प्रवेश प्रलंबित आहेत.

ज्या विद्यार्थ्यांकडे अँप्लिकेशन स्टेटसमधील बँक स्टेटस Sucsess असल्याची माहिती उपलब्ध आहे. त्यांना प्रेवशाची काही अडचण नाही मात्र ज्यांचे पेमेंट फेल अथवा डॅश आहे तसेच संबंधितांच्या अँपलिकेशनमध्ये Response not received form Bank आहे त्यांचे पेमेंट विद्यापीठाला प्राप्त न झाल्यामुळे प्रवेश प्रलंबित आहे. अशा विद्यार्थ्यांनी संबंधित स्क्रीन शॉट

घेऊन आपल्या युजर आयडी व पासवर्डसह तात्काळ विद्यापीठाकडे nondani@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेलवर दिनांक 28.10.2017 पर्यंत माहिती पाठवावी. ई-मेल करताना **'शिक्षणक्रम प्रवेश 2017-18 शुल्क पूर्ततेबाबत'** असा विषय टाकावा की जेणेकरून ई-मेल त्याचस्वरूपाचा असल्याचे लक्षात येईल व कार्यवाही लवकरात लवकर होऊ शकेल. ई-मेल केला असला तरी सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती विद्यापीठाकडे स्पीडपोस्टाने पाठवावयाच्या आहेत त्याशिवाय आपला प्रवेश कायम होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपल्या प्रवेशासंबंधी सर्व कागदपत्रे स्पीडपोस्टाने मा. परीक्षा नियंत्रक, यचममु विद्यापीठ, नाशिक 422222 ह्या पत्त्यावर **तात्काळ उपरोक्त दिनांकापर्यंत पोहचतील ह्या बेताने** पाठविणे अपेक्षित आहे. आपले कागदपत्रे ई-मेलवर अथवा पोस्टाने वेळेत न आल्यास अन्यथा आपला प्रवेश कायम न झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार रहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त शिक्षणक्रमाच्या ज्या विद्यार्थ्यांनी त्रुटीबाबत यापूर्वी विद्यापीठाकडे दुरूस्ती शुल्कासह पत्रव्यवहार केलेला आहे, त्यांची पूर्तता पूर्ण झालेली आहे. त्यांची संगणकीय दप्तरी नोंद देखील झालेली आहे. त्यामुळे संबंधितांनी पुन्हा पत्रव्यवहार करण्याची गरज नाही. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा. धन्यवाद.



प्रा.(डॉ.) अर्जुन पी. घाटुळे
परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी : 1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक, 2. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यचममुवि, नाशिक
3. मा. संचालक, विभागीय केंद्र द्वारा -अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड.
ता.क.- मा. केंद्रसंयोजकांना विनंती की, आपल्या अधिनस्त असलेल्या विद्यार्थ्यांचे बाबतीत वरीलप्रमाणे अडचण असेल तर तात्काळ मेलवरून माहिती पाठवावी.